# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल
### शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


क्र.विसस/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१७ २६३६ दि. ०५/१०/१७

**परिपत्रक**

**विषयः उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांची राज्यशासनाच्या MahaDBT Portal द्वारे अंमलबजावणी करणे बाबत..**
**गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना(AMS)**

संदर्भः १. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०१७/डीबीटी पोर्टल/ ११२५१, दि.२०.०९.२०१७
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि.०२.०८.२०१७.

सन २०१७-१८ पासून उच्च शिक्षण संचालनालय व विभागीय सहसंचालक, यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना या शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांचे नविन मंजूरी / नुतनीकरणाचे अर्ज **MahaDBT Portal** द्वारे www.mahadbt.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या वतीने गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना ही आठ विभागीय परीक्षा मंडळातील माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षांमध्ये गुणवत्ता यादीत वरचा क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी शासन निर्णय दि. १७ मे, १९८४ नुसार राबविण्यात येते. अशा विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळ, पुणे यांच्याकडून प्राप्त करून सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असेल त्यानुसार आर्थिक सहाय्य (प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, ग्रंथालय शुल्क, प्रयोग शुल्क, जिमखाना शुल्क, सत्र शुल्क, परीक्षा शुल्क, वसतिगृह शुल्क, भोजन शुल्क, पुस्तके व इतर साहीत्य वैद्यकिय शुल्क इत्यादी) अदा करण्यात येते.

माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा गुणवत्ता यादीमध्ये उच्च स्थान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी शासनाने खालील प्रमाणे संच तयास केलेले आहेत.

**माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा( इ. १० वी)**

१. सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधुन प्रथम पाच गुणवत्ताधारक विद्यार्थी/विद्यार्थीनी
२. गुणवत्तेनुसार पहिल्या तीन मुली (वरील पाच गुणवत्ता धारका व्यतिरीक्त)
३. गुणवत्तेनुसार मागासवर्गीयामधून पहिले तीन विद्यार्थी / विद्यार्थीनी (वरील अ व ब गुणवत्ताधारक व्यतिरीक्त) असे एकुण ८८ संच आहेत.

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा( इ. १२ वी)**

१. सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधुन प्रथम पाच गुणवत्ताधारक विद्यार्थी/विद्यार्थीनी
२. गुणवत्तेनुसार पहिल्या दोन मुली ( वरील पाच गुणवत्ता धारका व्यतिरीक्त )
३. गुणवत्तेनुसार मागासवर्गीयामधुन पहीले दोन विद्यार्थी / विद्यार्थीनी ( वरील अ व ब गुणवत्ताधारक व्यतिरीक्त )
४. विज्ञान विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी
५. कला विद्याशाखेतील पहीले दोन विद्यार्थी
६. वाणिज्य विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी असे एकुण १२० संच मंजुर आहेत.

शिष्यवृत्ती /आर्थिक सहाय्य योजनेच्या लाभासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली कार्यपध्दती, अटी, शर्ती, व निकष लागू राहतील. सदर माहीती **MahaDBT Portal** वर उपलब्ध आहे.

**शिष्यवृत्ती नवीन मंजूरी:**

१. संचालनालयामार्फत शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांस घरच्या पत्त्यावर पत्र पाठविण्यात येते. सदर पत्राची छायांकित प्रत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.

२. अर्जासोबत चालू वर्षाची फी भरल्याची पावती, हॉस्टेल असल्यास त्याची फी भरल्याची पावती अपलोड करणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्तीचे नुतनीकरण:**

१. नुतनीकरणाचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी उच्च शिक्षण संचालनालयाकडून विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या प्रथम पत्राची प्रत स्कॅन करून अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

२. कनिष्ठ महाविदयालयातील विद्यार्थ्यांना मागील वर्षात ५५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

३. वरिष्ठ महाविदयालयांतील विद्यार्थ्यांना मागील वर्षात ६५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

४. अर्जासोबत चालू वर्षाची फी भरल्याची पावती,हॉस्टेल असल्यास त्याची फी भरल्याची पावती अपलोड करणे आवश्यक आहे.

- सन २०१७-१८ साठी विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीचे ऑफलाईन पध्दतीने अर्ज करू नयेत. तथापी यापूर्वी सन २०१७-१८ साठी ज्या महाविदयालयांनी /विद्यापीठांनी विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज उच्च शिक्षण संचालनालय यांचेकडे सादर केलेले असतील त्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. तरी महाविदयालय/ विद्यापीठांनी संबंधित विद्यार्थ्यांना सूचना देऊन ऑनलाईन अर्ज भरणेबाबत कळविण्यात यावे. विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज न भरल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविदयालयाची राहील.
- सदर शिष्यवृत्तीच्या अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांचे महाविद्यालय/विद्यापीठ यांनी वेळोवेळी अवलोकन करावे.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय/विद्यापीठ यांनी छाननी करून त्वरीत पुढील टप्प्यावर ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावेत.
- विद्यार्थ्यांना अर्ज भरताना येणाऱ्या महाविद्यालय / विद्यापीठ यांना अर्जावर पुढील कार्यवाही करताना येणाऱ्या तांत्रिक समस्यासाठी MahaDBT Portal वर देण्यात आलेले टोल फ्री क्रमांक व ई-मेल आय.डी यावर संपर्क साधावा.
- तसेच सर्व अधिनस्त महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभागप्रमुख यांनी त्यांच्या महाविद्यालयांतील सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर MahaDBT Portal वरील योजनांचा जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी सदर MahaDBT Portal बाबतचा **सर्व तपशील तसेच पोस्टर आपल्या महाविद्यालयाच्या दर्शनीय सूचना फलकावर लावून** सदर योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. तसेच प्रस्तूत कार्यालयाकडून आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये दिलेल्या सूचनांनुसार विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठीही मदत करावी.

RBhosle
5/10/17

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,कोकण विभाग, पनवेल.

प्रति,

१. प्राचार्य/संस्था प्रमुख, सर्व अधिनस्त अशासकीय अनुदानित व विना अनुदानित, कायम विना-अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये, जि.ठाणे, पालघर,रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग.

२. कुलसचिव / कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई

३. कुलसचिव / कुलगुरु, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ चर्चगेट, मुंबई

प्रतः मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.